आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२८ मे २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यासाठी जोरदार प्रचार सुरू / आपल्या सरकारमध्ये भ्रष्टाचाराला थारा नसल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही
- महागाई आणि बेरोजगारी कमी करण्यात भाजपा अपयशी ठरल्याची काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी यांची टीका
- लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातल्या मतदानाची आकडेवारी निवडणूक आयोगाकडून जाहीर / सात कोटी पाच लाख ४४ हजार ९३३ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क
- छत्तीसगडमधल्या विविध चकमकींमध्ये सामील असलेल्या नक्षलवाद्याचं गडचिरोलीत केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढं आत्मसमर्पण

**आणि**

- मिझोराममध्ये दरड कोसळून १२ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठी सर्व राजकीय पक्षांचा जोरदार प्रचार सुरू आहे. रालोआ आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी आज देशात विविध ठिकाणी प्रचारसभा घेतल्या.

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज झारखंडमधल्या डुमका आणि पश्चिम बंगालमधल्या उत्तर चोवीस परगणा जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. या दोन्ही सभांमध्ये मोदी यांनी इंडिया आघाडीवर जोरदार टीका केली. इंडिया आघाडी आणि घटक पक्ष भ्रष्टाचाराचं सर्वात मोठं उदाहरण आहेत, असं ते

झारखंडमधल्या सभेत म्हणाले. आपल्या सरकारच्या काळात महिलांचं सक्षमीकरण झाल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

आपल्या सरकारमध्ये भ्रष्टाचाराला अजिबात थारा दिला जात नसल्याची ग्वाही मोदी यांनी पश्चिम बंगालमधल्या सभेत दिली. काँग्रेस आणि इंडिया आघाडीला सामान्य माणसाची काहीही पर्वा नाही, त्यांना फक्त स्वतःचं हित साधायचं आहे, असा आरोप त्यांनी केला.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी हिमाचल प्रदेशात विविध ठिकाणी प्रचारसभा घेतल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षांमध्ये अनेक कल्याणकारी योजना राबवल्या, आणि नागरिकांमधे चैतन्य आणलं, असं ते म्हणालं.

उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी साहिब लोकसभा मतदारसंघांत फतुहा इथं प्रचारसभा घेतली. काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाला देशाच्या विकासाला आळा घालत आहेत अशी टीका त्यांनी केली. प्रधानमंत्र्यांनी जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० रद्द केल्यानं दहशतवादाला मोठा धक्का दिला असल्याचं ते म्हणाले.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज वाराणसीच्या मोहन सराय आणि बांसगाव लोकसभा मतदारसंघात एकत्रित प्रचारसभा घेतल्या.

**<><><><><>**

महागाई आणि बेरोजगारी कमी करण्यात भाजपा अयशस्वी ठरल्याची टीका काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी केली आहे. हिमाचल प्रदेशातल्या गगरेट इथल्या प्रचारसभेत त्या बोलत होत्या. गेल्या वर्षी अतिवृष्टी आणि पुरामुळे हिमाचल

प्रदेशात उद्भवलेली परिस्थिती राष्ट्रीय आपत्ती म्हणून घोषित न केल्यावरूनही त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुखू यांच्यासह इतरांनीही प्रचारसभेला संबोधित केलं.

<><><><><>

इंडिया आघाडीत अंतर्विरोध असल्याची टीका भाजपाचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी केली आहे.ते आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलत होते. त्यामुळेच पंजाबमध्ये आम आदमी पक्ष काँग्रेसविरोधात, पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस काँग्रेसविरोधात लढत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. भाजपा केंद्रात तिसऱ्यांदा प्रचंड बहुमताने सरकार स्थापन करेले असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या शनिवारी पार पडलेल्या सहाव्या टप्प्यातल्या मतदानाची आकडेवारी निवडणूक आयोगानं जाहीर केली आहे. या टप्प्यात ५८ मतदारसंघांमध्ये एकंदर सात कोटी पाच लाख ४४ हजार ९३३ मतदारांनी आपला हक्क बजावल्याचं आणि ६३ पूर्णांक ३७ शतांश टक्के मतदान झाल्याचं आयोगानं सांगितलं आहे. टपाली मतदानाची मोजणी झाल्यानंतरच एकंदर मतदानाची अंतिम आकडेवारी देता येईल, असंही आयोगानं स्पष्ट केलं. लोकसभेच्या आगामी सातव्या टप्प्यासाठी मतदारसंघनिहाय मतदारांची आकडेवारीही आयोगानं आज प्रसिद्ध केली.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आज संविधान सदनात सेंट्रल हॉलमध्ये वीर सावरकर त्यांना पुष्पांजली वाहिली.

राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईत राजभवनात सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

<><><><><>

छत्तीसगड राज्यात विविध चकमकींमध्ये सहभाग असलेल्या एका नक्षलवाद्यानं आज गडचिरोलीत केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. २०१७ मध्ये छत्तीसगडच्या मिरतूर आणि २०२२ मध्ये तिम्मेनार इथं झालेल्या चकमकींमध्ये त्याचा सहभाग होता. महाराष्ट्र शासनानं त्याच्यावर ५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं. २०२२ पासून आतापर्यंत २२ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं आहे.

<><><><><>

मिझोराममध्ये आज सकाळी दरड कोसळून किमान १२ जणांचा मृत्यू झाला. राजधानी ऐझवलपासून चार किलोमीटर अंतरावरच्या ल्हिमेन इथं ही घटना घडली. मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसानं मोझारममधलं जनजीवन विस्कळीत झाली आहे.

<><><><><>

रेमाल चक्रीवादळानं बांगलादेशच्या किनारपट्टीच्या भागात प्रचंड विध्वंस केला आहे. या चक्रीवादळामुळं किमान १३ जणांचा मृत्यू झाला आहे. यातले बहुतेकजण घरं, झाडं आणि भिंती अंगावर पडून दगावले आहेत. रेमाल चक्रीवादळामुळे खुलना, बारीसाल आणि छत्तोगत्राम विभागांमध्ये ३० हजारपेक्षा जास्त घरं पूर्णपणे जमीनदोस्त झाली आहेत, दीड लाखापेक्षा जास्त घरांचं नुकसान झालं आहे. वादळाचा परिणाम दक्षिणेकडच्या जिल्ह्यांमधल्या वीजपुरवठ्यावरही

झाल्यामुळे दोन कोटीपेक्षा जास्त नागरिक रविवार रात्रीपासून अंधारात आहेत. सोमवारी सतत झालेल्या पावसामुळे ढाका आणि चित्तग्राम इथलं जनजीवन विस्कळीत झालं आहे.

<><><><><>

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी राज्यातल्या सर्व यंत्रणा सज्ज असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाची महत्त्वाची बैठक आज मुंबईत झाली. या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी बातमीदारांना ही माहिती दिली. हवामान इशाऱ्या संदर्भात महत्त्वाची माहिती नागरिकांना वेळेत कळावी, यासाठी हवामान विभागातल्या अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

या बैठकीत आपत्ती व्यवस्थापन, मान्सून पूर्व घ्यायची काळजी, जाहिरातीचे फलक, दरड कोसळण्याची ठिकाणं, मुंबईतल्या वस्त्या अशा विषयांवर चर्चा झाली. तसंच मराठवाड्यातला दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि गारपीटीच्या पंचनाम्यांची प्रक्रिया यांवरही चर्चा झाली. बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

भारताचा ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंद यानं आज स्टॅव्हॅन्गर इथं सुरु असलेल्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत शानदार सुरुवात करत, पहिल्या फेरीत फ्रान्सच्या फिरोझा अलिरेझाला ‘सडन डेथ’ खेळी करत पराभूत केलं.

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसननं गतविजेत्या डिंग लिरेनविरुद्धच्या स्पर्धेत आपलं वर्चस्व कायम राखलं. तर हिकारू नाकामुरा यानं आर्मागेडन सामन्यात फॅबियानो कारुआनाचा पराभव केला.

पहिल्या फेरीनंतर प्रज्ञानंद, कार्लसन आणि नाकामुरा दीड अंकांसह संयुक्तपणे अव्वल स्थानावर आहेत, तर अलिरेझा, लिरेन आणि कारुआना अर्ध्या अंकानं त्यांच्या मागे आहेत.

<><><><><>

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी जामीन वाढवून मिळण्यासाठीच्या याचिकेवर लवकर सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणी अरविंद केजरीवाल सध्या जामिनावर बाहेर आहेत. प्रकृतीच्या कारणास्तव काही चाचण्या करायच्या असल्यानं हा जामीन ७ दिवसांनी वाढवावा, अशी याचिका त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती.

यावर लवकर सुनावणी घ्यावी, अशी मागणी केजरीवाल यांचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी केली होती, मात्र या प्रकरणाचा निकाल न्यायालयाच्या एका वेगळ्या खंडपीठानं आधीच राखून ठेवला आहे, त्यात ढवळाढवळ करणं आम्हाला शक्य नाही, असं न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी स्पष्ट केलं.

या प्रकरणाच्या सुनावणीबद्दलचे आदेश देण्यासाठी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्यासमोर ते मांडावं, अशी सूचना त्यांनी सिंघवी यांना केली.

<><><><><>

हरियाणातल्या डेरा सच्चा सौदाचा प्रमुख गुरमीत राम रहीम याच्यासह इतर चौघांना रणजीत सिंह खून प्रकरणात चंडीगढ उच्च न्यायालयानं निर्दोष मुक्त केलं आहे. रणजीत सिंह यांची १० जुलै २००२ रोजी गोळ्या झाडून हत्या केल्याप्रकरणी सीबीआय न्यायालयानं या सर्वांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा

सुनावली होती. हा निर्णय आज चंडीगढ उच्च न्यायालयाने रद्द केला आणि दोषींची निर्दोष मुक्तता केली.

**<><><><><>**

पुण्यातल्या कल्याणीनगर कार अपघात प्रकरणी विशाल अगरवाल आणि सुरेंद्र अगरवाल यांच्या पोलीस कोठडीत न्यायालयानं ३१ मे पर्यंत वाढ केली आहे.

**//<><><><><>//**